ISSN No. 2348-2702

Impact Factor : 3.8699

PUBLISHING HOUSE
AURANGABAD

Peer Reviewed International Journal of Multidisciplinary Research

Address : F-40/5, Ayodhya Nagar, N-7, CIDCO, Aurangabad, Dist. Aurangabad. (M.S.) INDIA.

E-mail : apoorvjamdhade@rediffmail.com, bharatjamdhade1976@gmail.com, vandanabankar1980@gmail.com

Mob.: 9049591747 / 8177803216. Web Site : www.apoorvkph.com

# Certificate

*Date :* 30/9/2022

*This is to certify that Mr. / Miss. / Dr.* डॉ. कविता आर. पारकर

*of* गृहअर्थशास्त्र विभाग, डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, गामटी, रिंग रोड नागपूर

*Published a Paper entitled* स्त्री सक्षमीकरण आणि राष्ट्र निर्मितीत स्त्रियांचे योगदान

*in our journal's issue of* July - Aug - Sept 2022 *We wish him/her all the best for his/her future.*

Executive Editor

Bharat Jamdhade

Publisher
Apoorv Publishing House
Aurangabad - 431 003 (M.S.)

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440023

Editor

Dr. Vandana Bankar

Head of Home Science Dept.
Arts and Science College, Chincholi (Li)
Tal. Kannad, Dist. Aurangabad. (M.S.)
BOS Member (Home Science)
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, A'bad.

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 75 | स्त्री सक्षमीकरण आणि राष्ट्रनिर्मितीत स्त्रीयांचे योगदान<br>**डॉ. कविता आर. बोरकर** | 255 |
| 76 | राष्ट्र उभारणीत महिलांचा सहभाग<br>**प्रा.डॉ. संजय मगर** | 260 |
| 77 | विवाह आणि कुटुंब संस्थेतील गृहशास्त्राचे महत्त्व<br>**प्रा.सौ. मेघा सौरव देसाई** | 262 |
| 78 | भारतीय राजकारणात खेळाडूंचा सहभाग<br>**प्रा.राजेश अनंतराव कांबळे** | 267 |
| 79 | महिला सबलीकरण : एक चिंतन<br>**प्रा.गोपालकृष्ण श्रीराम राखोंडे** | 269 |
| 80 | धुम्रपानग्रस्त व धुम्रपान मुक्त असणाऱ्या तरुणांमधील चिंता आणि समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास<br>**डॉ. बी.यु. पवार** | 272 |
| 81 | शालेय बालकांचे पोषण – एक चिकीत्सक अभ्यास<br>**डॉ. गंगासागर तुळशीदास चोले** | 275 |
| 82 | भारतातील ग्रामीण विकास<br>**शिवाजी आप्पा सुरवसे** | 278 |
| 83 | बदलत्या जीवनशैलीचा स्त्री –आरोग्यावर होणारा परिणाम<br>**प्रा.सीमा व्ही. काळणे (एस.पी.सोनोने)** | 284 |
| 84 | वृद्धांच्या आरोग्यविषयक समस्या<br>**कु. वनिता किसनराम बोदडे** | 287 |


IMPACT FACTOR : 3.8699

ISSN : 2348-2702

*Multilingual Peer Reviewed*

# International Journal of Multidisciplinary Rese

July-August -September 2022 Vol. X Issue - III



PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

• EDITOR-IN-CHIEF •

• GUEST EDITOR •

Dr. Umakant Gaikwad Asst. Prof. Rameshwar Raut Asst. Prof. Pratibha Agharde Dr. Yashwant Gadhe

Scanned with OKEN Scanner

75

# स्त्री सक्षमीकरण आणि राष्ट्रनिर्मितीत स्त्रीयांचे योगदान

डॉ. कविता आर. बोरकर

• सहयोगी प्राध्यापक, गृहअर्थशास्त्र विभाग, डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, भामटी रिंग रोड, नागपूर 22

18 व्या शतकापासून स्त्रियांचे आपल्या हक्क आणि अधिकारासाठी वेळोवेळी लढे व आंदोलने सुरू आहेत. काळानुसार व गरजेनुसार या लढ्यांची उद्दिष्टे बदलली असली तरी ते पूर्णतः थांबले असे म्हणता येणार नाही. ते अजूनही विविध पातळ्यावर विविध कारणांनी सुरू आहेत.

स्त्रियांच्या या आंदोलनांना व जागरूकतेला स्त्रीसक्षमीकरण असे व्यापक नांव देण्यात आले. स्त्रियांचे सक्षमीकरण ही विकसनषील देषातच ऐरणीवरचा प्रश्न बनला. कारण एखाद्या प्रगतीचा विचार करतांना किंवा विकासाचे प्रमाण व स्वरूप ठरवितांना स्त्री सक्षमीकरणाचा निकष लावण्यात येऊ लागला. "ज्या देषातील स्त्री प्रगत तो देश प्रगत" हे घोष वाक्य मान्यता पावू लागले. स्त्री सक्षमीकरण या विषयावर अनेक भाष्ये, चर्चासत्रे व लिखाण होवू लागले. स्त्री सक्षम होणे गरजेचे आहे यावर विचारमंथन सुरू झाले.

विवेकानंदाच्या शब्दात "पक्ष्याला एका पंखाने उडता येत नाही," असे विधान करून कुटूंब व्यवस्थेत स्त्रियांना महत्वाचे व आदराचे स्थान असावे असे सुचविले.

स्त्री सक्षमीकरण हा आज स्वतंत्र विषय मानला जातो. समानता व सर्वांगीण विकासासाठी स्त्रीसक्षमीकरण गरजेचे आहे. स्त्री सक्षमीकरणाच्या काही व्याख्या पुढील प्रमाणे–

"स्त्रीयांना वैचारिक स्वातंत्र्य मिळणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण"

"स्त्रीयांना सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व वैचारिक पातळ्यांवर समानता प्रदान करणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण होय."

"स्त्री हा स्वतंत्र घटक मानून तिला विकासाच्या प्रक्रियेत बरोबरीचा दर्जा देऊन समाविष्ट करणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण."

"स्त्रीयांना मोकळा स्वास घेता येणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण होय."

"स्त्रीवादी चिंतन, विचारधारा, समानता, न्याय, लोकशाहीची तत्वे आणि सातत्य या मुद्द्यांचा सखोल विचार म्हणजे स्त्रीसक्षमीकरण." "व्यक्तिमत्व विकासास समान संधी देणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण."

थोडक्यात सक्षमीकरणाचा मुळापासून व संशोधनात्मक अभ्यास करणे गरजेचे आहे.

भारतात महिला अजूनही दुय्यम स्थानावर आहेत. त्या आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल तसेच निर्भर आहेत. पण वर्तमान स्थितीत स्त्रियांमध्ये शिक्षण व तत्सम कारणांमुळे जागृकता वाढत चालली आहे. त्यामुळे स्त्री सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा विचार गांभिर्याने गरजेचे आहे.

**स्त्रीसक्षमीकरणाची प्रमुख वैशिष्टे:–**

1) स्त्री सक्षमीकरण बहुआयामी असावे.
2) स्त्री सक्षमीकरण एक दुहेरी प्रक्रिया
3) स्त्री सक्षमीकरण ही स्वतंत्र कल्पना नाही
4) स्त्री सक्षमीकरण संपूर्ण व व्यापक असावे
5) विशेष केंद्रबिंदूना महत्व दिले जावे.
6) स्त्री शिक्षणास महत्व
7) गतीशिल व राजकिय प्रक्रिया

वरिल सर्व मुद्दे लक्षात घेवून स्त्री सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल केल्यास "सक्षम नारी– सक्षम भारत" हे कल्पनेतील चित्र वास्तवात आणता येईल.

**स्त्रीसक्षमीकरणासाठी वैयक्तिक पातळीवर अपेक्षित असणारे ठळक उपाय :–**

1) स्त्रियांनी स्वतःसाठी वेळ काढावा
2) स्त्रियांनी स्वतःमध्ये विश्वास व आत्मभान जागृत करावे
3) लहान–सहान निर्णयासाठी इतरांवर विसंबून राहू नये
4) कुटूंबातील व समाजातील मोठे निर्णय समोपचाराने सोडवावे
5) धार्मिक दृष्टिकोन समानतेवर आधारित असावा
6) स्त्रिवादी उपेक्षाप्रदान वक्तव्यांवर आक्षेप घेण्याचे साहस करावे.
7) सामाजिक व नैतिक मूल्यांचा विकास करावा.
8) प्रसंगी कणखरतेची भूमिका घ्यावी



Scanned with OKEN Scanner

9) स्पर्धा आणि महत्वकांक्षाकडे वाटचाल सुरू करावी
10) प्रसार माध्यमांनी तिला चुकीच्या भूमिकेत दाखविल्या त्यावर आक्षेप घ्यावे व बहिष्कार घालावा

खालील ओळी स्त्रीसक्षमीकरणाच्या संदर्भात पुरेशा बोलक्या आहेत.

तिच आहे घराचे घरपण
तिच अनंतकाळाची माता
तिच आहे विश्वनिर्मिती
तिच तिची भाग्यविधाता

नको तिला आधार खोटा
नकोच नुसत्या पोकळ बाता
"समानतेच्या हक्कांसाठी
तिच जगाची न्याय देवता"

समजून घ्या तिलाही
तिही माणूस आहे
तिच्या मुळेच जनहो
जिवन अमृत आहे.

देशाच्या विकास प्रक्रियेत स्त्री हा घटक एक मानव संसाधन मानला जातो. देशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकिय व सांस्कृतिक विकासात या घटकाचा वाटा महत्वपूर्ण आहे. वर्तमान काळात भारतात आर्थिक, सामजिक व राजकिय क्षेत्रात स्त्रीया समर्थपणे पुरूषांच्या बरोबरीने काम करित आहे. अनेक कार्यक्षेत्रात स्त्रीया कार्य करतांना दिसत आहेत. अनेक व्यवसाय देखिल स्त्रीया करतांना दिसत आहेत. स्त्रियांमध्ये स्वत:विषयी व कुटूंबाच्या हिताविषयी जागृकता निर्माण झाली आहे. वर्तमान काळात स्त्रियांचा कल आत्मनिर्भराकडे असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत त्यांच्या श्रमाचे आर्थिक वाटा 16 टक्के पर्यत वाढला आहे. अर्थात हे प्रमाण अधिक देखिल असू शकते.

नविन भारताच्या निर्मितीसाठी महिला सक्षमीकरणाअंतर्गत शासनातर्फे योजना राबविण्यात येत आहेत. ज्यापैकी स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी कौशल्य विकास योजना एक आहे. स्त्रियांसाठी ही योजना राबवितांना प्रमुख तिन गोष्टी विचारात घेतल्या जातात. 1) पैसा 2) कौशल्य 3) उद्योगशिलता, रोजगार प्राप्तीच्या उद्देशाने प्राथमिक स्तरावर त्यानुसार प्रशिक्षण दिले जाते. वेळोवेळी त्यांना उद्योग, सेवा, व्यापार, योजना, सेवा, विपणन, इत्यादी बाबत माहिती पुरविल्या जाते.

कुटूंब व्यवस्था तसेच समाजव्यवस्थेचे चित्र बदलत चालले असून आर्थिक, सामाजिक, राजकिय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच नैतिक व जागतिक पातळीवर स्त्रीयांना महत्व प्राप्त होवू लागले आहे. अभ्यासक तत्वचिंतक, समाजशास्त्रज्ञ, तसेच मानवशास्त्रज्ञांनी देखिल स्त्रियांचे महत्व मान्य केले आहे.

नवनिर्माणच्या वाटेवरील भारताचा विचार करतांना व त्यात स्त्रियांचे महत्व व भूमिकेचा विचार करतांना अनेक बाजूंचा व त्या--त्या क्षेत्रात स्त्रियांना भूमिका व महत्व समजून घेणे आवष्यक आहे.

**विविध क्षेत्र आणि स्त्रिया :**

**1) अर्थव्यवस्था आणि स्त्रिया–अर्थव्यवस्थेच्या रचनेनुसार ठळक दोन प्रकार केले जातात–**

अ) कृषिप्रधान अर्थव्यवस्था ब) उद्योगप्रधान अर्थव्यवस्था या दोन्ही अर्थव्यवस्थेत स्त्रियांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. कृषि क्षेत्रात स्त्रियांशिवाय एकही कार्य होत नाही. पेरणी–निंदणी ते कापणी व मळणी या सगळ्या प्रक्रियेत कालपर्यंत ती होती. पण याहीपूढे म्हणजे वर्गवारी, विपणन, मार्केटिंग, जाहिरात, पॅकिंग या क्षेत्रातही ती अग्रेसर झाली.

लघु व कुटीर उद्योगात स्त्रियांचे कार्य व कौषल्य उल्लेखनिय आहे. स्वंयरोजगारात पुरूषांच्या बरोबरीने स्त्रीया कार्यरत आहेत.

**2) आर्थिक प्रगती आणि स्त्रीया :**

आर्थिक क्षेत्रात लैंगिक समानता येणे हा आर्थिक प्रगतीच्या दृष्टिने महत्वाचा व सकारात्मक मुद्दा आहे. जागतिक समृद्धी आणि स्पर्धेत टिकून राहण्यासाठी श्रम बाजारात स्त्रियांचा वाटा अत्यंत फायदेशीर आहे. अनेक उपक्रम व उद्योगात स्त्री व्यवस्थपकांची संख्या वाढत आहे. जागतिक लिंग अनुपात 2015 च्या अहवालानुसार आर्थिक सहभाग आणि समानतेत लैंगिक भिन्नता 59 टक्के आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या आकडेवारीनुसार जगातील 40 टक्के रोजगारात स्त्रीया काम करतात. यावरून आर्थिक प्रगतीत स्त्रियांचे महत्व स्पष्ट होते.

**3) शिक्षण आणि स्त्रीया :**

स्त्री साक्षरतेचा दर अजूनही संपूर्ण भारतात विशेष वाढलेला दिसून येत नाही. पण जेथे शिक्षण व शैक्षणिक सोयी स्त्रियांपर्यंत पोहचल्या तेथे स्त्रियांचा विकास तुलनात्मकदृष्ट्या अधिक झालेला दिसून येतो. कदाचित म्हणूनच जेथे शिक्षण आहे तेथे महिला सशक्त व सक्षम आहे. घर, नोकरी,

व्यवसाय किंवा इतर क्षेत्रात स्त्रीया अधिक यशस्वीपणे आपल्या जबाबदाऱ्या पार पाडतात. भारतात स्वातंत्र्यापूर्वी स्त्री साक्षरता दर 18 टक्के होता पण आता तो 65 टक्के आहे. स्त्रियांमध्ये व्यवस्थापन कौशल्य अधिक प्रमाणात असते. ज्याचा उपयोग अनेक व्यावसायिक क्षेत्रांना झालेला दिसून येतो. इंदिर नूई, अरूंधती भट्टाचार्य, वंदना लुथरा, निता अंबानी, वनिता गुप्ता, दिपीका गोयकां, अंबिका धिरज, विनीता बाली, रेणूका रामनाथ, रेणू सूद, वनिता नारायण, पल्लवी सराफ, शुभालक्ष्मी पानेस, प्रिया नायर, विनिता सिंहानिया, अंजली बंसल, चंदा कोचर, सविता महाजन, शोभरा भरतीया, कल्पना मोरपरिया, जिया मोदी, स्वाती पिरामल, मल्लिका श्रीनिवास, एकता कपूर, फाल्गुनी नायर, आशु नायर, जरीना मेहता इत्यादी अनेक स्त्रीया आहेत ज्या उत्तम औद्योगिक व्यवस्थापक आहेत पण या सगळ्या सुशिक्षीत आहेत.

ग्रामिण व अशिक्षीत स्त्रीया देखिल कुषल प्रबंधक असतात, असु शकतात. पण योग्य शिक्षणाअभावी त्या मर्यादित क्षेत्रात वावरतात व सिमित उत्पन मिळवितात. वर्तमान काळात मात्र स्त्रिशिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे आर्थिक क्षेत्रातील स्त्रियांची भूमिका महत्वपूर्ण ठरू लागली आहे.

## 4) अर्थव्यवस्था आणि स्त्रीया :

एकूण लोकसंख्येत स्त्रियांचा वाटा बरोबरीचा असला तरी आर्थिक गणनेनुसार देषातील आर्थिक घडामोडीत स्त्रियांचा वाटात अत्यंत कमी आहे. एकूण 5.85 कोटी उद्योगात केवळ 13.73 टक्के उद्योगांची धुरा स्त्रियांच्या खांद्यावर आहे. देशातील एकूण उद्योगांची संख्या जवळ–जवळ 80.50 लाख आहे. देशातील एकूण 13 कोटी स्त्रियांच्या श्रमषक्तित 10.02 कोटी स्त्रीया ग्रामिण क्षेत्रांशी संबंधीत आहेत. परिणामी स्त्रियांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सरकारतर्फे रोजगार विषयक अनेक योजना राबविल्या जात आहेत. अर्थव्यवस्थेत स्त्रियांचा सहभाग वाढल्यास आर्थिक विकासाचा दर वाढत जाईल. थोडक्यात स्त्री आणि आर्थिक विकास हे समीकरण सर्वमान्य झाले आहे.

## 5) स्त्रियांची कार्यपद्धती व आकडेवारी :

स्त्री हा विकासातील एक महत्वाचा घटक असूनही असंघटीत व दुय्यम क्षेत्रात अजुनही गणला जातो. त्यामुळे जनगणनेत देखिल स्त्रियांच्या कार्याचा सहभाग व त्याची आकडेवारी अचूकपणे सांगितली जात नाही. त्यामुळे स्त्रियांचा कार्यातील सहभाग किती आहे याचा वास्तविक दर सांगता येत नाही. आर्थिक विकासातील स्त्रियांच्या सहभागाचे वाढते आकडे तिच्या कार्यातील वृद्धी दर्षवितात.

| क्रमांक | वर्ष | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| 1 | 1971 | 14.22% |
| 2 | 1981 | 19.67% |
| 3 | 1991 | 22.27% |
| 4 | 2001 | 25.07% |
| 5 | 2011 | 33.09% |

पुरूषांच्या तुलनेत स्त्रिया अधिक वेळ काम करतात हे सर्वमान्य आहे. पण तिचे आर्थिक योगदान अर्थव्यवस्थेत मोजले जात नाही ही अत्यंत दयनिय अवस्था आहे. अजूनही अनेक शारिरीक कष्टाची व कमी उत्पन्न मिळवून देणारी कामे स्त्रिया करतात. अनेक स्त्रिया सामाजिक कुप्रथांना बळी पडतात थोडक्यात शहरी क्षेत्रात, रोजगार व्यवसायात स्त्रियांचे प्रमाण व सहभाग वाढत आहे जे शिक्षीत स्त्रियांपूरते सिमित आहे.

## 6) श्रमशक्ती व स्त्रिया :

केंद्रिय सांख्यिकीय मंत्रालयाच्या सहाव्या आर्थिक गणनेनुसार एकूण श्रमशक्तीत स्त्रियांचा वाटा केवळ 25.5 टक्के आहे. एकूण लोकसंख्येत 50 टक्के असलेला स्त्रीवर्ग श्रमशक्तीत केवळ 25 टक्के गृहीत धरला जातो. म्हणजेच निम्मी श्रमशक्ती एकतर मोजली जात नाही किंवा दुर्लक्षीत केली जाते. मातृसत्ताक पद्धती असणाऱ्या काही राज्यात स्त्री उद्योजकांची संख्या अधिक आहे पण अनेक राज्यात स्त्री घटक व त्याची श्रमशक्ती दुर्लक्षित आहे. मैकींजी ग्लोबल इन्स्टिट्यूटने लैंगिक समानतेबाबत रिपोर्ट मध्ये असा उल्लेख केला आहे की, जर भारतात लैंगिक समानता स्थापित झाली तर जगातील कोणत्याही क्षेत्राच्या तुलनेत भारताच्या अर्थव्यवस्थेवर याचा प्रभाव सर्वाधिक पडेल. यामुळे 2025 पर्यंत भारताच्या सकल घरेलु उत्पादनात (जीडीपी) 7 अरब डॉलर पर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. पण यासाठी मोठ्या प्रमाणात बदल अपेक्षित आहे.

21 व्या शतकातील स्त्री विकासासाठी आज घर आणि नोकरी या दोनही पातळ्यांवर संघर्ष करीत आहे. शेतीपासून अंतराळापर्यंत ती प्रगतीची नवनविन दालने काबिज करीत आहे. पण दुसरीकडे



Scanned with OKEN Scanner

असंघटीत क्षेत्रातील स्त्री गुण आणि कौशल्य अजूनही जिवंत राहण्यासाठी संघर्ष करीत आहे.

भारतात स्त्रियांना देवी, गृहलक्ष्मी म्हटले जाते कारण ती कौटूंबिक अंदाजपत्रक कुशलतेने हाताळते. "द पिटरसन इन्स्टिट्यूट फॉर इंटरनॅशनल इकोनॉमिक्स आणि अर्नेस्ट ॲंड यंग" च्या अहवालानुसार जागतिक पातळीवरील एका संशोधनानुसार ज्या कंपन्यांच्या नेतृत्वात 30 टक्के वाटा स्त्रियांचा आहे, त्यांचा नफा मासिक 6 टक्के ने वाढू शकतो. 91 देषतील 21980 भिन्न–भिन्न प्रकारच्या जगातील कंपन्यांचे सर्वेक्षण करून हा निष्कर्ष काढण्यात आला.

थोडक्यात अजूनही भारतीय स्त्रियांना विकासाच्या पुरेशा संधी मिळालेल्या नाहीत. त्यामुळे विकासाच्या प्रवाहात तिची कार्यक्षमता वास्तविकते–पेक्षा अत्यंत कमी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

### 7) शेती आणि स्त्रिया :

शेती प्रत्यक्ष व अप्रत्यक्षेपणे आजही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती संपूर्ण अर्थव्यवस्थेची दषा आणि दिशा निश्चित करते. देषाच्या एकूण उत्पन्नात शेतीचा वाटा महत्वपूर्ण आहे. सर्वाधिक रोजगार मिळवून देण्याची क्षमता देखील कृषीत आहे. शेती आणि स्त्रिया हे एक जुने आणि सर्वमान्य समीकरण आहे.

कृषी संशोधक व वैज्ञानिक एम.एस. स्वामीनाथन यांच्या शब्दात स्त्रियांवर कुटूंब, मुले, त्यांचे पालन–पोषण इत्यादींची जवाबदारी असते. त्याचबरोबर त्या चरितार्थासाठी शेती व वनांमध्ये काम करतात. तेव्हा त्यांना आर्थिक मदत तसेच शासकीय अनुदान व योजनांची गरज असते. जसे बालगृह, पाळणाघर, पंचायत महिला कोष, इत्यादी. पण या सोयी अत्यंत कमी प्रमाणात किंवा नेहमीच्या बरोबरीने उपलब्ध आहेत. त्यामुळे स्त्रियाचे कार्य अधिक संघर्षमय झाले आहे.

### 8) सेवा क्षेत्र आणि स्त्रिया :

21 व्या शतकात तृतीय क्षेत्राची प्रगती अधिक होतांना दिसून येते. यात स्त्रियांचा देखील सहभाग वाढत आहे. ही भारतासाठी अत्यंत आषावादी व आनंदाची नवभारताच्या निर्मितीत स्त्रियांची भूमिका आहे. पण या क्षेत्रात स्त्रियांचा वावर बोटांवर मोजता येण्यासारख आहे. शिक्षण, संगणक, विद्युत सोयी, वाहतूक व दळणवळण सोयी, माहिती व मार्गदर्शन इत्यादी अभावी बहुसंख्य स्त्रिया अजुनही सेवा क्षेत्रांपासून बऱ्याच दूर आहेत.

शहरी क्षेत्रातील मुली व महिला मात्र सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कार्यरत होतांना दिसत आहेत. 'मेक इन इंडिया', 'स्मार्ट इंडिया', 'डिजीटल इंडिया' इत्यादिंसाठी ही सकारात्मक बाब म्हणता येईल.

### 9) समाज व्यवस्था आणि स्त्रिया :

पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना अजूनही श्रमाचा दुबळा घटक समजले जाते. म्हणूनच तिला दिली जाणारी मजूरी पुरूषांपेक्षा कमी आहे. कठीण काम करूनही तिचा आर्थिक मोबदला अत्यंत कमी आहे. कुटूंबातील पुरूषांचे वर्चस्व, नोकरीतील बॉसचे तर उतारवयात मुलांचे वर्चस्व यात तिचे कौषल्य व गुण अनेकदा दुर्लक्षित होतात. गृहिणी, दासी, ते अबला इत्यादि संबोधनांनी तिची नेहमी उपेक्षा केली जाते. तिची सामाजिक फरपट अजूनही थांबलेली नाही.

ज्या दिवशी समाजाची मानसिकता बदलेल त्यादिवशी भारतात स्त्रियांची दशा सुधारेल व ती आर्थिक विकासातील एक भक्कम व महत्वाचा घटक ठरेल. पण दुदैवाने आजही स्त्री एक भोगवस्तू, असुरक्षित घटक, अत्याचार, छळ इत्यादींची बळी ठरली आहे. नवनिर्माण करणाऱ्या भारतासाठी ही एक अत्यंत लांछनास्पद बाब आहे.

### 10) राजकीय क्षेत्र आणि स्त्रिया :

राजकीय क्षेत्रातील सहभाग स्त्रियांच्या समाजातील स्थान निश्चितीत महत्वाची भूमिका वठवितो. भारतात राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा वावर वाढला आहे. अनेक छोट्या–छोट्या गावात पंचायत राज ते नगरपालिकेपर्यंत निवडून येणाऱ्या व पदभार सांभाळणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण वाढले आहे. पण उच्चपदस्थ स्त्रियांचे राजकीय क्षेत्रातील प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे महिलांच्या हिताचे कायदे, योजना व नियम गरजेनुसार तया होत नाहीत. त्यांची काटेकोरपणे अंमलबाजवणी केली जात नाही. ज्याचा परिणाम म्हणजे महिला अजूनही सुरक्षित नाहीत. स्त्रीआरक्षणामुळे लहान पदांवर महिलांचा वावर वाढला आहे. पण स्त्रियांच्या कल्याणासाठी ठोस पावले उचलण्यास त्या कमी ठरतात.

किवर्ड : स्त्रीया, सक्षमीकरण, कुटूंब, राष्ट्र



Scanned with OKEN Scanner

**संदर्भ :**

1) गारे डॉ. गोविंद; "भारतीय स्त्री" हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे.
2) गांधी नंदिता; "स्त्री संघर्षाची नवी रूपे" पाप्युलर प्रकाशन, मुंबई.
3) कर्वे डॉ. स्वाती; "स्त्री विकासाच्या पाऊलखुणा"
4) अलका; डॉ देशमुख, "विविध आयामातून स्त्री", 2010, श्री साईनाथ प्रकाषन नागपूर
5) स्त्री सक्षमीकरण दशा आणि दिशा, प्रा.डॉ. वर्षा गेगणे, साई ज्योती पब्लिकेशन, नागपूर

♦ ♦ ♦



Scanned with OKEN Scanner